**CNR NO- MHSO060007602020**

**नियमित दिवाणी दावा क्र. ८५/२०२०**

**अंबादास भुसनर व इतर.**

वि.

महाराष्ट्र सरकार व इतर

## नि. क्र. १०७ वरील आदेश

## (घोषित दि. ०९/०१/२०२५)

०१] प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ तथा आदेश ६ नियम १७ प्रमाणे वादी क्र. ३ व ४ यांचे वारस पटलावर घेवून दाव्यामध्ये दुरुस्ती करीता दाखल करण्यात आलेला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे वादी क्र.३ हे दि.२२/०४/२०२४ व वादी क्र. ४ हे दि.११/०३/२०२३ रोजी मयत झालेले असून त्यांचे कायदेशीर वारसांना पटलावर येणे अत्यंत आवश्यक आहे. सबब, अर्ज मंजूर कण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०२] प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्जास प्रखर विरोध करण्यात आलेला आहे.

०३] माझे समोर पुढील मुद्दे उपस्थित होतात त्यावर माझे असलेले निष्कर्ष व त्याकरीता असलेली कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १] | वादी विनंती करतात त्याप्रमाण मयत वादी क्र. ३ यांचे वारस पटलावर घेवून दाव्यात दुरुस्ती होवून मिळणेस पात्र आहे काय ? | होय |
| २] | अंतिम आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ बाबतः–**

०४] प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठराव होवून मिळणेकरीता, निरंतर ताकीद मनाई हुकूम मिळण्याकरीता तथा इतर अनुषांगिक मागण्या मिळण्याकरीता दाखल

करण्यात आलेला असून वादीच्या कथनानुसार वादी क्र.४ यांचा दि.११/०३/२०२३ रोजी व वादी क्र.३ यांचा दि.२२/०४/२०२४ रोजी मृत्यु झालेला आहे. मयत वादी क्र. ४ ही वादी क्र. १ यांची आई असून असे दिसून येते की, त्यांचे वारस पूर्वीच वादी म्हणून पटलावर घेण्यात आलेले आहेत अश्या परिस्थीतीत वादी क्र. ४ यांचे वारस पटलावर घेण्याचा कोणताही प्रश्न उपस्थित होत नाही.

०५]　　मयत वादी क्र.३ हे वादी क्र. १ यांचे भाऊ असून त्यांना कायदेशीर वारस एक मुलगा व एक मुलगी असल्याचे प्रस्तावीत दुरुस्ती अर्जावरुन दिसून येते. प्रस्तुत दावा हा अचल संपत्तीबाबत असून त्यामध्ये मयत वादी क्र. ३ तथा त्यांचे मृत्युनंतर त्यांचे कायदेशीर वारसांचे दावा मिळकतीमध्ये दिवाणी हक्क गुंतलेले आहेत. वादी क्र. ३ च्या मृत्युनंतर त्यांची मुलगा व मुलगी यांना आपली बाजु मांडण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. वादीतर्फे मयत वादी क्र.३ यांच्या वारसांना वादी क्र. ३–अ व ३–ब म्हणून समाविष्ठ करण्याची विनंती करण्यात आलेली आहे. मयत वादी क्र. ३ चे वारसांना वादी क्र. ३('अ' व 'ब') असे समाविष्ट करणे योग्य असल्याचे माझे मत झाले आहे. प्रस्तुतची दुरुस्ती ही दावा गुणदोषांवर निकाली काढण्याकरीता आवश्यक असून ती मंजूर केल्यास प्रतिवादींवर कोणताही अन्याय होणार नाही. उलटपक्षी सदर दुरुस्ती नामंजूर केल्यास वादीचे अतोनात नुकसान होणार आहे. सबब, वादी दाव्यात दुरुस्ती करुन मिळण्यास पात्र असल्याचे माझे मत झाले आहे. करीता मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देतो.

**<u>मुद्दा क्र. २ बाबतः–</u>**

०६]　　वरील सर्व विवेचनावरुन प्रस्तुत अर्ज मंजूर करणे योग्य असल्याचे माझे मत झाले आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१] अर्ज मंजूर करण्यात येतो.

२] मयत वादी क्र. ३ यांचे वारसां वादी क्र.३('अ' व 'ब') म्हणून पटलावर घेण्याची तथा अनुषंगिक दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते. मयत वादी क्र. ४ यांचे बाबत देखील अनुषांगिक दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

३] वादीने विहीत मुदतीत सदरची दुरुस्ती करावी व पुढील तारखेपावेतो दुरुस्ती प्रत सादर करावी.

४] खर्च मुळ प्रकरणात.

**दि.०९/०१/२०२५.**

**(अमित अ.खंडाळे)**
**सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**पंढरपुर.**

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 09.01.2025 |
| Judgment/order signed by | : | |
| the Presiding Officer on | : | 09.01.2025 |
| Judgment/Order uploaded | | |
| on | : | 09.01.2025 |